**नियमीत दिवाणी मुकदमा नंबर ३८६/२०१७**
**निशाणी क्रमांक ७२ खालील प्रथम आदेश**

अर्ज वाचला. प्रतिवादी क्र.३ ते ५ तर्फे वकिलांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र.३ ते ५ तर्फे दाखल कागदपत्रांचे, फोटोंचे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र.३ ते ५ यांनी वादीने दावा मिळकतीमध्ये कोणतेही नवीन बांधकाम करु नये अथवा दुरुस्ती करु नये अशी एकतर्फा ताकीद अर्जाने मागीतली आहे. याकामी वादीतर्फे दाखल नि.१९ चे अर्जावर प्रतिवादी यांनी वाद मिळकतीबाबत आहे ती परिस्थिती ठेवावी असा आदेश करण्यात आला आहे. तो आदेश आजतागायत वाढविण्यात आलेला आहे. प्रतिवादी क्र.३ ते ५ याची हरकत आहे की, वादी हा वाद मिळकतीमध्ये नवीन बांधकाम व दुरुस्ती करत आहे. त्याच्या पुष्टीसाठी प्रतिवादी क्र.३ ते ५ यांनी आजरोजी दाखल केले नि.७५/१ वरील एकूण ६ फोटोंचा व आपल्या शपथपत्राचा आधार घेतलेला आहे. यावरुन प्रतिवादी क्र.३ ते ५ यांच्या वादकथनामध्ये सकृतदर्शनी तथ्य आढळून येते. मुळ काम हे नि.५ तुर्तातुर्त ताकीद अर्जावर युक्तीवादासाठी प्रलंबीत आहे. त्यामुळे वादी यांना पुढील तारखेपावेतो दावा मिळकतीबाबत यथास्थिती ठेवणेबाबत आदेश केल्यास वादींचे काहीही नुकसान होत नाही. मात्र तसा आदेश न केल्यास वाद मिळकतीचे स्वरुपात बदल होऊन प्रतिवादी यांच्यावर अन्याय होऊ शकतो. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१. वादी यांना अर्जात नमूद केलेप्रमाणे एकतर्फा ताकिदीचा आदेश का करण्यात येवु नये अशी कारणे दाखवा नोटिस काढण्यात येत आहे.

२. वादी यांनी पुढील तारखेपावेतो दावा मिळकतीबाबत यथास्थिती (status quo) ठेवणेची आहे.

३. यातील प्रतिवादी क्र.३ ते ५ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम ३(अ) ची पुर्तता करावयाची आहे. नोटिस परतावा तारीख दिनांक २९/०१/२०१९ अशी असेल.

सही/-

सांगली. (खा. अ. भेंडवडे)

दिनांक १९/०१/२०१९ ५ वे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,

सांगली